# वार्तापत्र

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोलीदिनांक ०५.०२.२०२१

| पो.स्टे /अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटनाता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचेनाव |
|---|---|---|
| आष्टी अप.क्र. २८/२०२०कलम ६५(ई),(फ)महा.दारुबंदी अधिनियम | मौजागांधीनगर जंगल परीसर<br>**घटनाता. वेळ** :-<br>दि.०३/०२/२०२१चे<br>१३:४५ते१५:३० वा.पर्यंत | फिर्यादी सरकारतर्फेपोहवा/१८५० निलकंठ सुकरु पेन्दामनेम.स्थानिक गुन्हे शाखा पोलीसअधिक्षककार्यालय,गडचिरोली<br>**आरोपीतांचेनाव** :-मानबनरेद्रनाथ रॉय रा. गांधीनगरता. मुलचेरा जि. गडचिरोली |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैधदारु मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदाराकडुन मिळालेल्या माहिती वरुन | पोहवा/१८५० निलकंठ पेन्दाम, पोशि/५३५४ सुनिल पुठ्ठावार, पोशि/३४६७ मंगेश राउत, मनापोशि/२३६१ पुष्पा कन्नाकेचानापोशि/२५४१ शेषराज नैताम | |

गडचिरोली जिल्हयातील अवैधदारुविक्रीतसेच बेकायदेशीरदारु वाहतुकीस आळा बसावा याकरीता मा.श्री. अंकितगोयल, पोलीस अधिक्षकगडचिरोली, मा.श्री. समीर शेख अपर पोलीस अधिक्षक(प्रशासन)यांनीगडचिरोली जिल्हयातील अवैधदारु–जुगार व ईतर अवैध व्यवसायांवर रेड करुन प्रभावीपणेकायदेशीर कार्यवाही करण्याचीतसेचदि. २०/०१/२०२१ रोजी पारपडलेल्या ग्रामपंचायतनिवडनिकीदरम्यान मौजा लक्ष्मपुरगावातील लोकांनी विषारी दारु प्राशनकेल्यानेदोनईसम मृत्यु पावले व आठईसमांना विषबाधा होवुन आजारी पडल्याने हातभट्टी गुळा मोहाची दारु गाळुन विक्रीकरणाऱ्यावरकडक व प्रभावी कार्यवाही करण्याचेजबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविण्यात आलेलीजबाबदारी पार पाडत असतांनादिनांक०३/०२/२०२१ रोजीकार्यालयात हजर असतांनागांधीनगर येथील मुखबीरद्धारेखबर मिळाली कि, हातभट्टी लावुन गळामोहाची दारु गाळुन ठोकविक्रेतानामेमानबनरेद्रनाथ रॉय रा. गांधीनगर हा आपले राहते शेताचे बाजुला जंगल परीसरात हातभट्टी लावुन गुळा-मोहाची दारु गाळीत आहे. अशा खबरे वरुन स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीसनिरीक्षक उल्हास भुसारी सा. गडचिरोली यांना माहीती देवुन यांचे मार्गदर्शनाखाली व आदेशान्वयेस्थानिक गुन्हे शाखेतील वरीलनमुद पोलीस पथक हे शासकिय वाहन क्रमांक एम.एच. ३३ सी -०३१२ नेगडचिरोली येथुन रवाना होवुन पोस्टे आष्टी येथेजावुन पोस्टेमधील सिल साहीत्य सोबतघेवुन आष्टी येथुननिघुन मौजागांधीनगर येथे पोहचुन मुखबीर ला भेटुनखबरेची खात्री करुनयेथील स्थानिकदोन पंचाना प्रोव्ही रेड बाबतखबरदेवुनत्यांना सोबतघेवुन पो.स्टॉप व पंच असेअवैधदारु रेड कारवाई करीता मिळालेल्या माहीतीचे आधारेमौजागांधीनगरयेथील आरोपीच्या शेताजवळील जंगल परीसरात लपत-छपतगेलो असता आरोपीच्या शेताचे बाजुच्या जंगल परीसरातएकईसम काहीतरी लपवित असतांनादिसुन आला आम्ही त्याचे जवळ जाताच आमची त्याला चाहुल लागताचतो आम्हाला पावुन पळुन गेला. आम्ही त्याचा पाठलागकरुन पकडण्याचा प्रयत्नकेले असता मिळुन आला नाही. पडुनजातांना पंचानी पाहुन त्यास ओळखुन पडुनजानाराईसम हा मानवनरेद्रनाथ रॉय असल्याचे सांगीतले पडुनगेलेल्या ठिकाणी येवुनपंचासमक्ष पाहणी केली असता २०० लिटरक्षमतेच्या निळया रंगाच्या प्लॉस्टीक ०७ नगड्रॅम मध्येदारु गाळण्याकरीता टाकलेला १४०० लिटर गुळा-माहाचा सळवा किंमत १,४०,०००/- रुपये व २० लिटरक्षमतेच्या पिवळया रंगाचे प्लॉस्टीककॅनमध्ये २० लिटर हातभट्टी गुळा मोहाची दारु अवैधविक्री किंमत २०० /- रुपये प्रति लिटर प्रमाणे ४,०००/- रुपये असा एकुन १,४४,०००/- किंमतीचा अवैध मुद्देमाल मिळुन आल्यानेगुन्हयातील आरोपीविरुध्द पोलीस स्टेशन आष्टी येथे वरीलनमुदकलमान्वये गुन्हा नोंदकरण्यात आला आहे.